MHST070010972023

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १९८/२०२३ मधील निशाणी २५ खालील आदेश</u>**

**<u>श्रेयस गजानन जगताप तर्फे अ.पा.क आकांक्षा वि. गजानन जगताप वगैरे</u>**

**(पारित दिनांक – १४.०७.२०२५)**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मूळ दाव्यात दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. १ गजानन कृष्णराव जगताप हे दि. २५/०५/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात वादी व प्रतिवादी नं. २, ४, व १० हेच वारस असून ते यापूर्वी दाव्यात सामील आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. १ यांचे नावास कंस करण्यात येवून त्यापुढे "मयत" असे लिहण्यास परवानगी मिळण्याकरिता व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी नं. ४ व १० यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने खोटी व लबाडीची असल्याचे कथन केले. तसेच पुढे त्यांनी असे कथन केले की वादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादी हे प्रतिवादी नं. १ यांचे कायद्याने वारस नसल्याचे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. अर्ज व म्हणणे वाचले तसेच दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा हा वादींनी प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी, जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालू असतांना प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. १ गजानन कृष्णराव जगताप हे मयत असून वादी व प्रतिवादी नं. २, ४ व १० हेच वारस असून ते यापूर्वीच दाव्यामध्ये सामील आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादी नं. १ यांच्या नावापुढे मयत असे नमूद करुन त्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती

करणे आवश्यक असून त्याप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे वाटते. प्रस्तुत मयत प्रतिवादी नं. १ यांचे वारस हे दाव्यामध्ये सामील आहेत. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची आवश्यकता नाही. वादी मागणी करत असलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून दाव्याच्या गुणदोषावर व सदोष निकाल देणेसाठी वादीस उपरोक्त नमूद दुरुस्ती करण्याची संधी देणे, न्यायोचित राहील व मुळ दाव्याच्या गुणदोषावर निकाल देणेस मदतच होईल. तसेच सदर दुरुस्ती करण्याची परवानगी देणे, नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. वादीस प्रस्तुत दाव्यामध्ये दावा दुरुस्ती करणेस संधी दिलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन गुणदोषावर न्यायनिर्णय होणेस मदतच होणार आहे. सबब, मी पुढील प्रमाणे आदेश पारित करते.

## आ दे श

१. सदर निशाणी २५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी सदरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत दाव्यात नमूद दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन, त्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर त्याचदिवशी दाखल करावी.

**( प्रशांत पी. कुलकर्णी)**

दिनांक :– १४/०७/२०२५

४थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड.